# प्रकरण तिसरे

## 'गारपीट' आशय व स्वरूप

# प्रकरण तिसरे
# 'गारपीट' आशय व स्वरूप

'गारपीट' हा विलास सिंदगीकर यांचा प्रकाशित झालेला अनुक्रमे दुसरा कथासंग्रह असून त्यामध्ये एकूण अकरा कथांचा समावेश केलेला आहे. या कथासंग्रहातील कथांना वास्तव अनुभवाचा स्पर्श झालेला आहे. मराठवाड्यासारख्या भागात जाती-धर्मांचे स्पृश्य-अस्पृश्यांच्या भिंती कशा उभ्या आहेत हे 'गारपीट' कथासंग्रहामधील कथांतून प्रत्ययास येते. त्यामध्ये ब्राह्मणाच्या बाहेरख्यालीपणा तसेच सर्वसामान्य शेतकरी, दारिद्र्यरेषेखालील वर्ग इत्यादींचे जीवन सुधारण्यासाठी मिळणाऱ्या योजनांची अयोग्य अंमलबजावणी याचे तटस्थपणे चित्रण लेखकाने केल्याचे दिसून येते. 'भूकबळी' या कथासंग्रहामधून ज्याप्रमाणे भूकेचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याचप्रमाणे सिंदगीकरांनी 'गारपीट' या कथासंग्रहातील काही कथांमधून भाकरीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. तसेच आदिवासी जमातीचे प्रश्न अद्यापही सुटलेले नाहीत, याचे विवेचन विलास सिंदगीकरांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्या कथांतून ग्रामीण, दलित, आदिवासी समाजाच्या ज्वलंत समस्या मांडल्याने त्यांच्या कथांना विविधता लाभलेली आहे. प्रामुख्याने त्यांच्या गारपीट कथासंग्रहातील कथांचे आशयदृष्ट्या १.दलित २.ग्रामीण आणि ३.आदिवासी जीवन असे वर्गीकरण करणे योग्य होईल. सामान्यत: या तीन मुद्द्यांचा आणि 'गारपीट' मधील व्यक्तिचित्रण, संवादात्मकता व निसर्गचित्रण यांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

## १.'गारपीट' मधील दलित जीवन :

दलित जीवन हे गावगाड्याशी संलग्न पण गावकुसाबाहेरील व्यवस्थेशी निगडित असते. दलित समजला गेलेला समाज हा गावकुसाबाहेरील दु:ख, दारिद्र्य, अज्ञान, भूक या घटकांना तोंड देऊन जीवन व्यथित करतो. अशा या दलित जीवनाला अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न सिंदगीकरांनी आपल्या कथांमधून केलेला आहे. विकासापासून वंचित असणारी व भटकंती करून जीवन जगणारी दलित घिसाडी अथवा लोहार या जमातीचे दु:ख मांडले आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ज्याला शिक्षणाचा परिस्पर्शही झालेला नाही. अशा घिसाडी समाजातील रूढी, परंपरा, विधी, जीवनव्यवहार, लग्नपद्धती त्याच्या उपेक्षित जीवनाचा परिपूर्ण आलेख मांडण्याचा प्रयत्न 'टच्चा' या कथेत केला आहे. घिसाडी समाज हा राजपुतांची वंशावळ असावी असे सांगणारा सूर्याजी चव्हाण हा पेरणीच्या तोंडावर गावात येतो. व शेतीसाठी लागणारी अवजारे तयार करून देत असतो. गावात त्याच्या मेहूण्याचा पदरबंध म्हणजेच विवाह असतो. त्यामुळे तो महिनाभर त्या गावातच राहणार असतो. नियमानुसार एकटे न राहता आपल्या जातीतील एकतरी नातेवाईक सोबत असावा असे तो म्हणतो. दारू पिऊन गोंधळ घालणाऱ्या सूर्याजीला गौतम सूर्यवंशी गुरूजी दारू सोडून द्यावयास सांगतात तेव्हा सूर्याजी म्हणतो, "आव मास्तर, आमी जल्मल्याबरूबर आमास्नी चार थेंब दारूची गुट्टी देत्यात. तवा सवय लावायचा सवालच उठत नाय बघा."[१] आणि जर दारू सोडली तर जात पंचायतीला टच्चा द्यावा लागतो. यावरून घिसाडी समाजातील बालसंस्कार किती विचित्र, अनोख्या पद्धतीने केले जातात याचे दर्शन होते. गुरूजी जेव्हा टच्चा म्हणजे काय? असा प्रश्न सूर्याजीला विचारतात तेव्हा सूर्याजी म्हणतो, "आमच्या समाजात भांडण-तंटा, लगीन, म्हतुर, फारकत या जात गुन्ह्याच्या निवाडी बुजरूक लोक करत्यात. आमी त्यांच्या इरूद्ध वागल्यास दंड द्यावा लागतो. त्यास टच्चा म्हणत्यात बघा."[२] लग्नविधी पार पाडताना घिसाडी लोक पालाला मांडव समजून त्या मांडवाला देव समजतात प्रत्येक घिसाड्याच्या पालासमोर बकरे कापले जाते.दारू आणि मासांहार यांचे जेवण करून एकमेकांच्या कळा काढूण लग्नविधी पार पाडले जातात. घिसाडी समाजातील नियमानुसार सूर्याजी हा घरजावई असतो. त्यामुळे त्याला दहा हजार रूपयाला विकत घेतलेले असते. पण सूर्याजी चव्हाण सारखा तरुण मरण पावतो, तेव्हा मात्र त्याच्या मरणाचे दु:ख न वाटता सासऱ्याने जात-पंचायतीला 'टच्चा' म्हणून दिलेले दहा हजार रुपये बुडाले याचे वाईट वाटते.

'पोटाड्या' ही कथा मातंग समाजातील पोतराज या प्रथेवर बेतलेली आहे. भारतीय समाजात अजूनही दलित असलेल्या मातंग समाजातील लोकांचा पोटाचा प्रश्न सुटलेला दिसून येत नाही. लालबा मोरे हा मातंग समाजातील पोटाड्या म्हणजे पोतराज मरीआईचा

भगत बनून आपली पत्नी व मुलगा यांच्याबरोबर खेळ करून उपजीविका करत असतो. लालबा मोरे पोतराज होऊन स्वतःच्या अंगावर आसूडाचे फटके ओढून घेतो. तर त्याची पत्नी ढोलकं वाजवत असते. ढोलकीच्या तालावर "आठ आणे, रूपडं द्या, मालक ? तुमचे लेकरूला पून लागल, तुमचं मसाई-जोगाई भल्ल करूस, गरिबाले दान धर्म कराजी."[३] असे म्हणून आपला खेळ दाखवून पोट भरण्याचा प्रयत्न करतात. पण जेव्हा इंग्लडहून डॉ.जॉन राईट साहेब भारतीय संस्कृतीचा, चालीरितींचा, रूढी-परंपरांचा अभ्यास करण्यासाठी भारतात येतात.तेव्हा जॉन राईटच्या समोर पोतराज येतो.तेव्हा भारतीय संस्कृतीमधील पोतराजाचा खेळ लंडणमध्ये दाखविण्याची कल्पना मांडतात.लालबा मोरे ही जात-पंचायतीला जेवण घालून लंडणला जाण्यास परवानगी काढून घेतो.पण पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये पोतराज म्हणजे एक अंधश्रद्धेचे विकृत दर्शन घडविणारे माध्यम ठरते. मि.हंटरसाहेबांना पोतराजाचा आक्राळ-विक्राळ रूप पाहून ते भूत असावे आणि ते देशावर आलेले मोठे संकट असावे या विचाराने तो पिस्तुलाचा चाफ ओढतो आणि पोतराज लालबा मोरे मृत होतो. या घटनेनंतर लालबा मोरे याची पत्नी हरणाबाई मोरे आपल्या मुलखात येऊन पोतराज म्हणून सोडलेल्या आपल्या मुलाचे केस कापते, ढोलकं फोडते आणि म्हणते, "आजपासून म्या पोटाड्या खेळ लेकराला करू देणार न्हाय. माझा पोलादासारखा नवरा गेला. आरं देवा, आमी तुझीच लेकरं हावतं... मग माझा नवरा का वाचवला नाहीस ? तुझ्या कुजक्या संस्कृतीवर गाढवं..."[४] असे असले तरी हे वास्तवतेच्या कसोटीत टिकत नाही.

'उद्ध्वस्त' ही कथा विलक्षण अस्वस्थ करणारी वास्तववादी वाटणारी कथा आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले असे आपण म्हणतो पण स्वातंत्र्य नक्की कोणाला मिळाले याचा विचार करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ही कथा करते. ग्रामीण समाजात जातिभेदाची संकल्पना इतकी दृढ झालेली असते की, त्यामुळे दलितांना गावातील हातपंपावर पाणी भरून दिले जात नाही. आज शिक्षणाने माणूस सुसंस्कृत होतो. परिवर्तनाचे कार्य त्याच्या हातून घडविले जाते, पण कितीही माणूस शिकला तरी जात-पात याविषयींच्या संकल्पना त्यांच्या मनावर कायमच्या दृढ होऊन जातात. याचीच जाणीव 'उद्ध्वस्त' या कथेतून येते.

दुष्काळाच्या काळात मुंबईला कामानिमित्त गेलेला मातंग समाजाचा राजाराम कदम आपल्या मुलाच्या विवाहासाठी सहकुटुंब गावी येतो. लता ही राजाराम कदम याची मुलगी पाणी भरण्यासाठी गावातील हातपंपावर येते, तेव्हा तिला स्पृश्य-अस्पृश्यतेची जाणीव करून दिली जाते. मात्र मुंबईत वाढलेल्या लताला जात-धर्म, स्पृश्य-अस्पृश्य याची जाणीव नसते. २१ व्या शतकात देखील स्पृश्य-अस्पृश्य या संकल्पनेमुळे गावातील लोक तिला पाणी भरावयास विरोध करतात. ती त्या लोकांच्या विरोधाला न जुमानता हंडा भरायला हापशाला हात लावणार तोच धनाजी सडके तिचा हंडा लाथेने उडवून लावतो आणि म्हणतो, "आगं येऽ भवाने, मांगा-म्हारानं आता हितं पाणी न्हाय भरायचं. आमच्या घरी लगीन हाय. पावण्या-रावळ्यास्नी शिवाशिव नंग. मांगा-म्हारांचा आम्हाला विटाळ होतो. आमी त्यांना शिवून घेत नाय."[५] शहरामध्ये संकुचित विचारांच्या भिंती नसल्यामुळे गावातील लोकांना न जुमानता ती आपला हंडा भरण्यासाठी पुढे सरसावते तेव्हा माणूसकी नसलेला धनाजी सडके म्हणतो, "या रे, या मांगटीला लय तोंड सुटलंय... घाला सालीला लाथा... रस्त्यावरच भोगा सालीला..."[६] लता केवळ दलित आहे व पाण्याचा हापसा बाटवला म्हणून तिला खुप मोठी किंमत मोजावी लागते. तिच्यावर अमानवी अत्याचार करतात त्यामुळे तिचे संपूर्ण कुटुंबच उद्ध्वस्त होते. आजही जाती-धर्माच्या, स्पृश्य-अस्पृश्य विचारांनी अशी कितीतरी कुटुंबे उद्ध्वस्त होताना दिसतात. त्यामुळे लेखक या कथेच्या माध्यमातून वाचकांपुढे काही प्रश्न उपस्थित करतात की त्यांची अद्यापही उत्तरे मिळणे अशक्य आहे.

- **सुशिक्षित दलितांच्या वैचारिक द्वंदाचे चित्रण :**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये दलितांना जन्मत: अस्पृश्यतेमुळे शिक्षणापासून वंचित ठेवले गेले. पण महात्मा जोतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी स्त्री-पुरुष शिक्षणाची मुहूर्त मेढ रोवली. शिक्षण म्हणजे परिवर्तनाचे बीजं होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा! या संदेशाने दलित तरुण वर्गामधील अस्मितेला आणि आत्माभिमानाला जागृती आली. दलित समाज शिक्षणाकडे वळला. शिक्षणाच्या आधारेच तो समाजामध्ये स्वत:चे मानाचे स्थान निर्माण करू लागला.

दलित समाजातील मुलांप्रमाणे मुलींमध्ये ही शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. ही अभिमानास्पद बाब असली तरी सध्याचा विचार करता त्यांची विचारधारा ठिसूळ होताना दिसून येते. त्यांची मानसिकता अपंग होत जाते. याचे प्रत्ययकारी चित्रण 'वळणवाटा' या कथेच्या माध्यमातून लेखकाने केले आहे. स्त्री-पुरुष समानता असा विचार करणारा आनंद भारतीय संस्कृतीप्रमाणे मुलगी पाहावयास विरोध करतो. कारण वयाच्या चौदा-पंधरा वर्षापासून तो आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ता असल्यामुळे त्याला मुलगी पाहणे म्हणजे बाजारात जावून जनावर विकत घेतल्यासारखे वाटते. पण पाहूण्यांच्या आग्रहास्तव तो मुलगी पाहावयास जातो. पण शिक्षणाने चंगळवादी संस्कृतीला बळी पडलेल्या वंदनाला जेव्हा तो प्रश्न विचारतो तेव्हा दोघांच्याही वळणवाटा, जगण्याचे मार्ग वेगळे आहेत याची कल्पना येते. त्यांच्या आवडी-निवडीतही खूप फरक पडत होता. याची जाणीव त्या दोघानींही ऐकमेकांना विचारलेल्या प्रश्नावलीतून दिसून येते ती अशी,

"तुम्ही कोणती पुस्तके वाचत असता ?" वंदना

"मी पुरोगामी विचारांची परिवर्तनवादी पुस्तके वाचतो."

मग आनंदने तिला विचारले,

"तुम्ही कोणती पुस्तके वाचता ?

"मला पाककलेची पुस्तके वाचायला आवडतात."

आनंद आणखी काही प्रश्न विचारतो,

"मग तुम्हाला कोणती गीत ऐकायला आवडतात ?"

"ऐका दाजिबा... कांटा लगा... काला कौवा काट जायेगा सच बोल...

ही रिमिक्स गाणे आवडतात." वंदनाने उत्तर दिले.

"मला वामनदादा कर्डकांची आंबेडकरी गीते, सुख-दु:खाचे विविध पैलू उलगडणारे हृदयस्पर्शी गीतं आणि मराठमोळी लावणी, भावगीतं आवडतात."[७] अशाप्रकारे आनंद जेव्हा आपली आवड वंदनाला सांगतो तेव्हा मात्र वंदना नापसंती दर्शविते कथेची नायिका वंदना आणि साहित्याच्या चळवळीच्या माध्यमातून आपले योगदान, आपले विचार नोंदवू पाहणारा आनंद

यांच्या विचारातील मानसिक द्वंदामुळे ते वैचारिकदृष्ट्या, राहणीमाणाच्या दृष्टीने दोघांच्याही वळणवाटा वेगवेगळ्या असल्यामुळे ते जोडीदार म्हणून एकत्र येऊ शकत नाहीत.

- **दलितांच्या मानसिक परिवर्तनाचे चित्रण :**

हिंदू धर्मातील देव या संकल्पनेविषयी विद्रोही, नाविण्यपूर्ण विचार मांडताना डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, "देव ही कल्पना भावुकतेची अंधश्रद्धेची आणि अपरिवर्तनीय अशी आहे. हिंदू धर्मातील देव हा एक मानसिक आजार आहे. असे म्हटले तरी वावगे ठरू नये. वस्तुत: देव आणि धर्म या कल्पना कल्याणकारी आणि अभयदान देणाऱ्या हव्यात. परंतु हिंदू धर्मात त्या नेमक्या उलट आहेत. धर्माने आणि ईश्वराने माणसाला अधिक भयाकूल केले आहे. या भितीतूनच तो अंधश्रद्धा आणि पर्यायाने निष्क्रीय बनतो. मनाच्या दुबळेपणाची अचूक जाणीव असणाऱ्या ब्राह्मण पुरोहित वर्गाने धर्म आणि देव या दोन्ही बाबींचे भय सर्वसामान्याच्या मनावर बिंबवले. यातूनच पुढे स्वर्ग-नरक, पाप-पुण्य या कल्पना आल्या आणि माणूस स्वकृर्तत्वापेक्षा दुबळेपणाचे प्रदर्शन करू लागला."[८] अशाच विद्रोही विचारसरणीने वाटचाल करून विलास सिंदगीकरांनी 'प्रतिशोध' आणि 'लांडकसण' या कथेत परिवर्तनीय विचारधारा आत्मसात केल्याचे दिसून येते. 'प्रतिशोध' ही कथा स्वत: लेखक त्यांच्या आयुष्यातील घडलेल्या घटनेचे वास्तववादी चित्रण आहे. लेखक रूढी-परंपरा, भोंगळ अंधश्रद्धा यांना कडाडून विरोध करताना दिसतो. लेखकाचे आई-वडील आपला मोठा मुलगा केशव बारावी पास व्हावा या हेतूने सत्यनारायणाची पूजा घालतात. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर व फुल्यांच्या वैचारिक चळवळीत वाढलेल्या लेखकाला ते अयोग्य वाटते. पूर्व संस्कारानुसार चालत आलेल्या पुजा-अर्चा, धर्म-विधी, आचरण पद्धती याला कडाडून विरोध करताना लेखकाची नास्तिकता दिसून येते. त्याचबरोबर हिंदू धर्मव्यवस्था नाकारून त्यात आमूलाग्र परिवर्तन करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

लेखकाचे वडील लेखकाला दोन महिन्याचे राशन न पाठवता जवळजवळ आठशे रूपयांचे सत्यनारायण पुजेचे साहित्य आणतात. त्यामुळे लेखक चिडतो आणि वडिलांना म्हणतो, "बाबा ऽ या देशातील मनुवादी भटा-ब्राह्मणांनी काल्पनिक देव आपल्यावर

लादलेत. देव संकल्पना थोतांड आहे. जन्मलेल्या प्रत्येक माणसाची जन्मतारीख राहते. त्यांना जन्मतारीख नाही. ते पुस्तकातले देव आहेत. मनुवादी भटा-ब्राह्मणांना आपल्या भल्याबुऱ्याची कायबी काळजी नाही. ते बाहेरून आलेले आर्य आहेत. अन् आपण मूळ निवासी नागवंशीय आहोत. आपण आणि आर्य एक नाही. यांचे आणि आपले आडनाव एक नाहीत. रक्त एक नाही. त्यांनी आपल्यावर हजारो वर्षापासून अत्याचार चालू ठेवले आहेत. त्यांनी वामनाच्या हातून कुणबी बळीचं राज्य संपवलं. मूळ निवासी प्रत्येक नायकाला त्यांनी ठार मारलं या देशाची सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक सत्ता ताब्यात घेतली. म्या त्या भटाला आपल्या आपल्या घरी येऊ देणार नाही."[९] असे म्हणून लेखक पुजा उधळून लावतो. जेव्हा घडलेला प्रसंग राजाराम जोशी गावातील लोकांना सांगतो तेव्हा लेखकाला जाब विचारण्यासाठी गावातील पंच मंडळी येतात आणि राजाराम जोशी गरीब ब्राह्मण म्हणून त्याची बाजू मांडतात. तेव्हा लेखक म्हणतो, "माझा ब्राह्मणांना विरोध नाही, माझा ब्राह्मण्यवादाला विरोध आहे. तो ब्राह्मण्यवाद ब्राह्मणाचा, मराठ्यांचा, दलितांचा तो कोणाचाही असो. ज्याने या भारत देशात मनूची निर्मिती करून मूळनिवासी बहुजन समाजातील लोकांच्या सहा हजार जाती, उपजाती निर्माण केल्या. या देशात सामाजिक क्रांती कधीच होऊ नये, अशी व्यवस्था निर्माण करून ठेवली. चातुर्वर्ण्य व्यवस्था निर्माण केली, ते लोक आपले होऊ शकत नाहीत. म्हणून म्या सत्यनारायणाच्या पूजेला विरोध केलाय."[१०] लेखकाच्या या विचाराने लोक आल्यापावली घरी निघून जातात. पण देवमाणूस म्हणणारा नारगोंडा पाटील जेव्हा ब्राह्मण राजाराम जोशीला आश्रय देतो. तेव्हा बाहेरख्यालीपणाचा गुलहौसी, लिंगपिसाट वृत्तीचा ब्राह्मण जेव्हा पाटलाच्या पत्नीवर हात टाकण्याचा प्रयत्न करतो तेव्हा मात्र भटाला दिली वसरी आणि हळूहळू पाय पसरी याचा प्रत्यय येतो.

अशाप्रकारे लेखक सत्यनारायण कथेचा, पुजेचा फोलपणा, ब्राह्मणांचा भोंदूपणा याचा नवविचारांच्या माध्यमातून पर्दापाश करण्याचा प्रयत्न करतो. 'लांडकसण' ही कथा अंधश्रद्धेवर प्रहार करणारी आहे. 'लांडकसण' या कथेत बौद्ध असणाऱ्या म्हारूती या लहान मुलाच्यात परिवर्तनीय आंबेडकरी विचार कसे येतात याचे चित्रण केलेले दिसून येते.

मराठवाड्यामध्ये मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी गावात लांडकसण साजरा करण्याची प्रथा आहे. बौद्ध असल्याने म्हारूतीच्या वडिलांना लांडकसण मान्य नव्हता. आपल्या मुलानेही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखे खूप शिकावे घराचे, जातीचे, गावाचे नाव मोठे करावे यासाठी ते म्हारूतीला लांडकसणाला जाऊ न देता शाळेत पाठवितात. पण आपल्या मित्रांच्या बरोबरीने आपणही लांडकसण साजरा करावयाचा या प्रबळ इच्छेने तो शाळेतून धाडसाने पळून जातो. आणि मित्रांच्या बरोबरीने लांडकसणाच्या तयारीला लागतो. तेवढ्यात लालबा तात्या येऊन लांडकसण कसा करायचा याबद्दल माहिती देताना म्हणतात, "आरं बाबा ऽ चार पाच बांड पोरांनी नागुळ व्हायचं सम्दी नागुळे पोर पळत जाऊण कोणत्याही शेतातील हिरवं धान्य हरबरा, जवसाचे धाटं उपटून आणून लांडग्याच्या म्होर निवद म्हणून दाखवावं लागतं. अन् लांडगे होऊन गेलेली पोरं वापस येऊजेकुणा कोणीबी तयार झालेल्या अन्न-पाण्याला शिवायचं नसतं"[११] त्यानुसार म्हारूती आणि त्याचे काही मित्र लांडगे होऊन गावचे पोलिस पाटील रामराव पांडे यांच्या शेतातील हिरवागार हरभरा जाऊण उपडतात. लांडकसणासाठी चोरी करायला आलेल्या पोरांना रामराव पाटील पकडतो. त्यामध्ये असणाऱ्या म्हारूतीचे मनगट गच्च पकडतो. पण दारूच्या नशेत तर्र ऽऽ असलेल्या रामराव पांडेच्या हाताला झटका देऊन म्हारूती आपली सुटका करून घेतो. पण त्याचे मित्र मात्र रामराव पांडेच्या तावडीत सापडतात. पण त्यानंतर वानरांमुळे रामराव पांडेवर अतिशय वाईट प्रसंग ओढवतो. त्यामुळे त्याच्या तावडीतून इतर मुलांची सुटका होते. वानरांनी नागुळ्या अवस्थेतील मुलांना पाहताच ते आपलेच नातेवाईक असावे असे वाटल्याने ते मुलांना इजा पोहचवत नाहीत. मात्र रामराव पांडेसारख्या माणसाला ते रक्त बंबाळ करतात. अशा भयंकर संकटातून म्हारूतीची सुटका होते आणि म्हारूतीची एक वेगळीच मानसिकता तयार होते. सेंट्या काकुळतीला येऊन म्हारूतीला लांडकसण जेवावयास येण्यास आग्रह करतो. पण म्हारूती एका अटीवर येण्याचे मान्य करतो. ती म्हणजे, "म्या तुमच्या संग जेवायला येतो. बरीक म्होरच्या साली कुणाच्या घरी लांडकसण मागयचं नाय. लांडकसण करायच नाय. बापू... आपण लांडकसण केला नसतो, तर आज आपल्यावर आसला बाका परसंग आला आस्ता का ?"[१२] या सर्व प्रसंगातून म्हारूती

स्वत:ला सावरतो पण त्या बालमनात एक परिवर्तनवादी विचारधारा येतात. "या लांडग्या सणाच्या देवानं माझ्यावर संकट आणलं आमचं रक्षण करीत नाय ते कसला देव ? आजपासून म्या दगडाच्या देवाची पूजा कधीच करीत नाय. आमचे बाबासाहेब आंबेडकरबी देवाला मानत नव्हते. देवाच्या पाया पडत नव्हते. आम्हाला देव न्हाय ? या चिखलाच्या देवाला ठेऊन काय कामाचं ?"[१३] असे म्हणून तो स्वत: तयार केलेले चिखलाचे मंदिर मोडून लांडगेही फेकून देतो आणि मनाशी निश्चय करतो की, "म्या आयुष्यात येऊन पुन्हा लांडकसण करणार नाही."[१४] एकूणच 'गारपीट' कथासंग्रहातील आशयामध्ये दलित जीवनाची अभिव्यक्ती विविध परिवर्त नांच्या माध्यमातून झालेली आहे.

## २. 'गारपीट' मधील ग्रामीण जीवन :

ग्रामीण जीवन हे ग्रामीण समाज व संस्कृतीशी निगडित असते. ग्रामीण समाज जीवनाचे उपजिवीकेचे मुख्य साधन म्हणजे शेती होय आणि म्हणूनच ग्रामीण जीवनामध्ये शेतकऱ्याबरोबर अलुतेदार-बलुतेदार यांचा समावेश केला जातो. ग्रामीण जीवनाच्या कक्षेत आतील आणि कक्षेबाहेरचा उपेक्षित घटक हा विलास सिंदगीकरांच्या कथेचा मध्यवर्ती विषय आहे. ग्रामीण जीवनाबरोबर उपेक्षितांचेही यथार्थ जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ग्रामीण जीवनातील ज्वलंत प्रश्न त्यांनी आपल्या कथांमधून मांडले आहेत. मराठवाड्यासारख्या अवर्षण ग्रस्त भागात असलेल्या शेतकऱ्यांचे दुरावस्थेचे वर्णन ही केलेले दिसून येते. ग्रामीण भागात समजला गेलेला उपेक्षित घटक हा ग्रामीण जीवनातील एक अविभाज्य घटक असतो. ग्रामीण भागातील शेतकरी तसेच सरकारी योजनांपासून अलिप्त राहणारा उपेक्षित समाज हा शोकांतिकेचा विषय कथेच्या माध्यमातून मांडला आहे.

शासनाने राबविलेल्या कल्याणकारी योजनांचा गावातील पुढारी मंडळी स्वत:च्या स्वार्थासाठी कसा गावातील दलित लोकांचा यशस्वीरित्या वापर करतात आणि त्यातून व्यवस्थित बाहेर पडतात. याचेच चित्रण 'घरकुल' या कथेत केल्याचे दिसून येते. 'घरकुल' या कथेत दलित असणारा थोरबा मोरे सिकंद्राबादला विटाचा कारखाना बंद झाल्यानंतर तो आपल्या गावी येतो. पण गावात घर नसल्याने तो समाज मंदिरातच आपला छोटासा संसार

थाटतो. पण त्याला स्वत:चे छोटेशे घर असावे असे वाटते, म्हणून तो गावचे सरपंच टिकोजीराव पाटलाला म्हणतो तेव्हा पाटील म्हणतो, "आरं थोरबा, गावात घरकुलची इस्कीम आली हाय. मग तुझी तयारी आसल तर...? मग आमाला नंतर सांग."[१५] आणि तु दारिद्र्यरेषेखालील आहेस ना? असा प्रश्न विचारतो पण भोळा अडाणी असणारा थोरबा मोरे याला आपली जात कोणती, आपण दारिद्र्यरेषेखाली येतो की नाही हे सुद्धा त्याला माहिती नसते. त्यामुळे बेरकी पाटील म्हणतो, "आरं थोरबा, तुझं नाव दारिद्र्यरेषेखाली नाही. पण तू कायबी चिंता करू नगस. म्या तुला घरकुल देणारच हाय."[१६] असे म्हणून पाटील त्याला घराचे स्वप्न दाखवितो. पाठीवर विन्हाड घेऊन फिरणारा थोरबा मोरे त्याच्या हातातील खेळणे बनतो. पाटील दिलेल्या खोट्या आश्वासनाची दखल म्हणून तालुक्याच्या अभियंत्याला बोलावून आठ दिवसाच्या आत घरकुल योजनेच्या खोल्या बांधून, त्यांची रंगरंगोटी करून रिकामा होतो. टिकोजीराव पाटील आपल्याला निवडणूकीचे तिकीट मिळविण्यासाठी इंदिरा आवास योजनेखाली निर्माण झालेल्या झोपडपट्ट्याचे उद्घाटन करण्याच्या निमित्ताने तो आपला स्वार्थ साधून घेण्यासाठी तो शेतकरी मेळाव्याचे आयोजनही करतो. पण निसर्गाच्या कहरामुळे निकृष्ठ दर्जाचे बांधकाम केलेल्या झोपड्या जमिनदोस्त होतात. त्यामुळे हतबल झालेल्या थोरबा मोरेची आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याची पाटलाने सरकार दरबारी नोंद केलेली असते. त्यामुळे दरिद्री असणारा थोरबा मोरे दारिद्र्यरेषेत येण्या अगोदरच तो दारिद्र्यरेषेच्या वर आलेला असतो.

'गारपीट' या पहिल्या शीर्षक कथेमधून मातीशी नाते जोडलेल्या व शेतीसाठी निसर्गावर अवलंबून असणाऱ्या तुकाराम पवाराचे लेखकाने केलेले चित्रण मन अस्वस्थ करते. शेतीसाठी लागणाऱ्या पैशामुळे तो कर्जबाजारी होतो. त्याला मागील वर्षीचा जिल्हा परिषदेचा आदर्श शेतकरी म्हणून पुरस्कार मिळालेला असतो. त्यामुळे आपली शेती चांगली पिकवावी आणि देणेदाराचे देणे टाकूण द्यावयाचे या उद्देशाने तो कर्ज काढून शेती चांगली पिकवतो. पण निसर्ग जेवढा चांगला तेवढा घातकी असतो, आणि त्याचा प्रत्यंतर म्हणून अचानक गारांचा अवखळी पाऊस पडायला सुरूवात होते. अशा अचानक झालेल्या गारपीटामुळे हाती येत

असलेल्या पिकांचे नुकसान होते. त्याचे वर्णन लेखकाने अतिशय संयमाने केले आहे ते असे, "तुकाराम पवारची तूर बहरली व्हती. तुरीचे सातही बहर टिकले व्हते. त्यामुळे तुरीच्या फांद्या-फांद्याला पिवळी धमक फुलं झडून शेंग धरली व्हती. शेंड्याबुडास्नी लागलेल्या तुरीच्या शेंगानं तूर वाकली व्हती. पोटच्या लेकरावाणी तुरीचा वाढवा केला. कारण त्याला तूरच डोक्यावरचं कर्ज कमी करील असं वाटत व्हतं पण गारपीटाच्या पावसानं व्हत्याचं नव्हतं केलं."[१७] त्यामुळे तुकाराम पवार मानसिकदृष्ट्या हतबल होतो. गारपीटग्रस्त गाव म्हणून शासकीय अधिकारी तालुक्याहून मामलेदार, गटविकास अधिकारी, राजकीय पुढारी गावात येऊन गावातील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीची तपासणी करून त्याचा पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देतात. पण सावकाराकडून शेतीसाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीच्या कल्पनेने तो दु:खी होतो. देणेदारांचा ससेमिरा ही लागतो. दोन महिने झाले तरी तुकाराम त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत असतो. तेवढ्यात तुकारामाचा बाहेरगावी असलेला मुलगा यशवंत रात्रीचाच घरी येतो. त्याला एवढ्या रात्री येण्याचे कारण विचारता तो म्हणतो "उद्या गारपीटग्रस्त शेतकऱ्याच्या नुकसान भरपाईचा चेक मिळण्याची तारीख आहे."[१८] आपणास नुकसान भरपाईचा चेक मिळणार या कल्पनेने मानसिकदृष्ट्या उद्ध्वस्त झालेल्या तुकारामाला खुप आनंद होतो आणि कल्पना केल्याप्रमाणे तो आपल्या मुलाला म्हणतो, "एक लाख रूपयाची नुकसान भरपाई लिहून नेलंय तवा त्याच्या निम्मेतरी मिळतील म्हणतो."[१९] आणि आता आपले कर्ज फिटणार या विचाराने तो जळकोट तालुक्याला तहसीलदार कार्यालयात गारपीटग्रस्त लाभधारक शेतकऱ्यांचा चेक घेण्यास जातो आणि त्यामध्ये तुकारामाचे यादीमध्ये पहिले नाव येते. तुकारामाला भरपाई म्हणून चार पायल्या हरभरे आणि चेक मिळतो. पण जेव्हा तो चेक पाहतो तेव्हा मात्र तो मानसिक संतुलन बिघडल्याप्रमाणे वर्तन करतो आणि म्हणतो, "आरं मला चेक मिळाला...! आरं पोरव्हा मला, गारपिटानं नुकसान झालेल्या शेतीचा चेक मिळाला...हा...हा...हा...आरं, मला चेक मिळाला..."[२०] कारण त्याला मिळालेला चेक हा फक्त तीनशे साठ रुपयांचा होता आणि तो ज्या बँकेचा होता. त्या बँकेपर्यंत जाण्यासाठीच अडीशे रुपये लागणार होते. तर बँकेचे

वैयक्तिक खाते काढावयास शंभर रूपये लागणार होते त्यामुळे तुकाराम पवाराचे मानसिक संतुलन बिघडल्यागत होते. अशा प्रकारे आदर्श शेतकरी असणाऱ्या तुकाराम पवारासमोर आत्महत्येशिवाय दुसरा मार्गच उरला नव्हता. खरोखरच आजही मोठ्या प्रमाणात मराठवाड्यासारख्या प्रदेशात निराश, हतबल झालेल्या शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे तुकाराम पवार हा प्रातिनिधिक शेतकरी म्हणून समोर येताना दिसतो.

'सोंग' ही कथा अस्वस्थ करणारी असून परंपरागत चालत आलेल्या अंधश्रद्धेवर प्रहार करणारी आहे. परंपरेनुसार चालत आलेल्या मोहरम मधील सोंग आणण्याच्या प्रथेमुळे, अंधश्रद्धेमुळे निष्पाप राजेसावला कशा प्रकारे मृत्यूला सामोरे जावे लागते याचे लेखकाने केलेले चित्रण मन सुन्न करते. रूढी, परंपरा, सण, उत्सव हे ग्रामीण माणसांच्या हाडीमासी खिळलेले असतात. ग्रामीण भागात जे सण साजरे केले जातात ते आंतरिक नात्यांनी जोडलेले असतात. ग्रामीण भागात अजूनही काही प्रमाणात जाती-धर्मांची बंधने न पाळता सर्व लोक एकत्रित येऊन सण साजरा करतात. अशाच प्रकारे 'सोंग' या कथेत परंपरागत चालत आलेल्या मोहरम या सणासाठी गावातील हिंदू-मुस्लिम सर्व जाती धर्माचे लोक मिळून सणाला उत्साहात सुरुवात करतात. मोहरम या सणाला कशी सुरुवात होते याचे वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे केले आहे, "गावातल्या वेशीतील चौकात मौलालीसाब आणि इमाम हुसेनसाब यांचा डोला बसला गेला. त्या डोल्याला एक काठी व्हती. डोल्याची काठी चंदनाच्या लाकडाची व्हती. त्या काठीला राजेसाहेबच्या मायनं लंगरचे कपडे चढवलं डोल्याचं तोंड चांदीची चंद्रकोर व्हती. चंद्रकोरीच्या कानाला घुंगराचे घोस बसवले व्हते. लोकांनी देवाच्या गळ्यात नोटांची, निंबा-नारळाची तोरणमाळ घातली व्हती. डोला नटला व्हता. सवारी सजली व्हती. देवाच्या म्होरं ऊद उगळला गेला. उदबत्ती लावली. नारळ फोडून साखर-गुळ वाटला गेला. देवावरच्या कपड्याला लावलेल्या अत्तरवासाच्या सुगंधाने माणसांची मने चैतन्यानं फुलली. डोल्याच्या सुगंधाच्या दरवळ गावभर पसरला."[२१] गावातील लोक हातात दस्त्या, काठ्या, कुऱ्हाडी आणि गंज लागलेल्या तलवारी घेऊन हालगीच्या सहाय्याने, "दर्यानाला साब की दो चारो दीन ऽ धुल्ला ऽ धुल्ला ऽऽ धुल्ला ऽऽऽ जिकच्याक ज्यांगची धुल्ला..."[२२] असे

म्हणून धुल्ला हा खेळ खेळतात. त्यानंतर परंपरेने सोंग आणण्याची प्रथा असल्याने 'दोन बायका आन् फजिती ऐका' या सोंगातून अंगात येणे हे कसे खोटे आहे हे पटवून दिले जाते. पण लोक हे सर्व गमंत म्हणून पाहतात. दुसरे सोंग राजेसाब, लालबा, हैदरसाब, संतराम, दौलबा मिळून सादर करतात. सोंग सुरू होताच लोक पोट धरून हसतात. पण या सोंगाच्या माध्यमातून भोळ्या, साधा-सरळ वीस-बावीस वर्षाच्या राजेसाबला मृत्यूला आपलेसे करावे लागते. कारण सोंगातील शेवटचा भाग म्हणून राजेसाबने चार वर्षापासून भूताचे सोंग आणण्यासाठी सुताराकडून तयार करून घेतलेला लाकडाचा भुताचा मुखवटा घालून राजेसाब विनोदी भूमिका वटवत असल्यामुळे त्याच्या त्या सोंगाला पाहून लोक पोट धरून हसायला लागतात. भानामती झालेल्या स्त्रीला भूत झालेला राजेसाब म्हणतो, "हा...हा...हा...म्या तुला धरलो हाय. म्या भुताची भानामतीवाला भूत हाय."[२३] पण स्त्री वेषातील संतराम मी तुला सोडत नाही असे म्हणून काठी घेऊन मुखवट्यावर मारतो तेव्हा मात्र राजेसाब आरडतो आणि म्हणतो, "ये अल्ला ऽ मुझे कोई तो बचाव रे? मैं मर गया रे? मेरे सिर का टोप निकालो रे?"[२४] पण लोकांना ते सोंग वाटून ते मनसोक्त हसविण्यात घालवितात. त्यामुळे या घटनेकडे दुर्लक्ष केल्यामुळे राजेसाबला मृत्यूला आपलेसे करावे लागते. कारण त्याने करून घेतलेल्या लाकडाचा मुखवटा जुना असल्यामुळे त्यामध्ये जाऊन बसलेली इंगळी डंक मारते.

विलास सिंदगीकरांनी ग्रामीण जीवनातील प्रत्यक्षातील माणसे त्यांच्या स्वभावानुसार कथेत चितारलेली आहेत. वेगवेगळ्या स्वभावानुसार माणसे ग्रामीण जीवनामध्ये वावरताना दिसतात. 'संपत्याचं लगीन' या कथेमधून व्यक्ती, व्यक्तीचा स्वभाव आणि प्रसंग या त्रयीच्या सहाय्याने विनोदाची हलकीशी कारंजी उडवलेली दिसते. 'संपत्याचं लगीन' ही कथा लेखनीच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत विनोदाने परिपूर्ण भरलेली आहे. 'लग्नाचा प्रसंग' या विषयाभोवती कथा वावरताना दिसते. गावातील कर्ता असलेला आणि पंचक्रोशीत ज्याच्या शब्दाला मान आहे, असा श्रीमंत माणूस दिलीपराव संकटे अण्णा यांचा संपती हा मुलगा असतो. बायकी वळणाचा, अडाणी, निरक्षर संपतीला गावातील वृद्ध स्त्रिया संपतीला बोलावून म्हणायच्या की, "सं...प...ती, असचं रडका गडी राह्यल्यावनी किती दिस राहयचं

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

रं...? आरं पोरा, वंशाला दिवा व्हावं म्हणत्यात ? जिनगानीत येऊन लगीन करून घेणं लई बरं असतंया."[२५] त्यावर बायकी वळणाचा संपती म्हणतो की, "आवं, लगीन बिगीन कायबी नग मा ऽ य...! बायकू म्हंजी उगंच जिवाला कटकट, नायते पिडा. म्या उगं व्हावं म्हन्ती माय तसंच आपुलं... बायको काय बसून खायला घालनार हाय का ? आन आजी, बायकूला करून घेऊन तिला काय खंदून घालायचं हाय का माय खोल मसनवट्यात...![२६] संपतीचे काही केल्या लग्न ठरत नसते पण चमत्कार घडावा त्याप्रमाणे तुळजापूरहून संपत्याला पाहावयास पाहूणे येतात आणि सोयरीक जुळते. संपतीचे लग्न म्हणून सारा गाव लग्नाच्या दिवशी एकजुटीने कामल लागतो पण रंडोला असलेल्या संपतीला विवाह होऊ नये असे वाटते आगि अचानक संपतीवर निसर्गाची कृपादृष्टी होते आणि त्याचाच फायदा घेऊन संपती लग्न मांडवातून पलायन करतो.

## ३. 'गारपीट' मधील आदिवासी जीवन :

आदिवासी ही जमात अत्यंत मागासलेली, दुर्गम भुप्रदेशामध्ये वास्तव करणारी व निसर्गावर पूर्णपणे अवलंबून असणारी अशी असते. त्याचप्रमाणे ती समाजातील मुख्य प्रवाहापासून दूर असल्यामुळे त्या जमातीचा भटकी जमात म्हणून उल्लेख केला जातो. एका विशिष्ट भौगोलिक प्रदेशामध्ये त्यांचे वास्तव असते आणि अशाच आदिवासीच्या जगण्याचे चित्रण सिंदगीकरांच्या काही कथामधून झाल्याचे दिसून येते. ज्याप्रमाणे दलित साहित्यातून वास्तववादाला भिडणारे चित्रण येते. त्याचप्रमाणे आदिवासी साहित्यातूनही ते प्रतिबिंबित होते. तरीही दलित व आदिवासी साहित्यामध्ये काही प्रमाणात फरक असल्याचे प्रत्ययाला येते, आणि हा फरक सांगताना डॉ. गोविंद गारे म्हणतात, "मागास समाजामध्ये व्यथा ही केवळ एका व्यक्तीची नसून ती त्या त्या जनसमूहाची सामूहिक व्यथा असते. विषमतेवर आधारलेल्या प्रत्येक समाजघटकाची व्यथा वेगळी, दु:ख वेगळी, अनुभूती वेगळी असते. दलितांचा अनुभव वेगळा, आदिवासींचा अनुभव वेगळा, त्यांची संस्कृती वेगळी, त्यांचा इतिहास वेगळा, ते ज्ञानसंपदेला व सांस्कृतिक परंपरेला वंचित राहिलेले. दलित हे गावकीमध्ये राहिलेले, आदिवासी समाजापासून अलग पडलेले, त्यामुळे त्यांचा अनुभव हा वेगळा राहणारच त्यांचा

अविष्कारही वेगळाच असणार. दलित साहित्याप्रमाणेच आदिवासींच्या साहित्याचे वेगळेपण मान्य केलेच पाहिजे."[२७] दलित-आदिवासी हे एकाच छेदन बिंदूतून जाणारे साहित्य असले तरी त्याचे अनुभव व भूमिका वेगळी असल्याचे दिसून येते. त्या दृष्टीने सिंदगीकरांची 'भाकरीचं झाड' ही कथा महत्त्वाची वाटते. गोंड, कोलाम तोडा कोळी, नाग, मादिगा, लमाण, मधुरी आणि गोरबंजारा या आदिवासी जमातीचे चित्रण प्रस्तुत कथेमध्ये आल्याचे दिसून येते. या आदिवासी जमातीतील गजराबाई आडे हे मुख्य पात्र आहे. मोहाडी तांड्यात बंदाट्याचं घर करून ती एकटी राहत असते. पण तिचा लिंगपिसाट वृत्तीचा दिर काडेप्पा आडे-पाटील हा सूड उगविण्याच्या हेतूने गजराबाई ही मोहाची दारू काढून विकते असा आरोप तिच्यावर करतो, आणि या गुन्ह्याखाली गजराबाईला पोलीस पकडून नेतात. जंगल कायद्यानुसार जंगलातील मोहाची फुले, तेंदूची पाने तोडण्यावर बंदी घातली असली तरी निसर्गावर अवलंबून असणाऱ्या आदिवासींच्या जगण्याचे ते प्रमुख साधन असते. पण जेव्हा केस कोर्टात उभी राहते, तेव्हा मात्र ती गुन्हा कबूल करते त्यामुळे तिला पाचशे रूपये दंड अशी शिक्षा जाहीर होते. पण आपली साक्ष देताना गजराबाई न्यायाधिश साहेबांपुढे आपली सत्य बाजू मांडते तेव्हा मात्र मन सुन्नबधिर होते. ती म्हणते, "सायब, तुमच्या कायद्यात मव्ह गोळा करणे म्हंजी दारू काढणं हाय. बरीक आमच्या करिता मव्हाचं झाड 'भाकरीचं झाड' हाय ? भूक पोटाच्या आतड्यातून आक्रोश करीत माणसाला इमानही इकायला लावते. माणसाला माणसातून उठवणाऱ्या भूकेसाठी म्या तीन महिन्याची शिक्षा भोगायला राजी हाय बघा. बरीक मला पाचशे रूपड्यापरीस पाच महिन्यांची शिक्षा करा. म्या तुमच्या पाया पडते बरीक मला शिक्षा वाढवून द्या जी ?"[२८] मोहाच्या फुलापासून बनवून आणलेली भाकरी गजराबाई जेव्हा दाखवते तेव्हा न्यायाधिश साहेबांचे डोके सुन्न बधिर होते. कारण स्वातंत्र्योत्तर कालखंडात देखील विकासापासून शेकडो मैल दूर असलेल्या आदिवासींच्या भाकरीचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. याची जाणीव प्रकर्षाने होते. पण जेव्हा केसचा निकाल उद्यापर्यंत राखून ठेवला जातो. तेव्हा भारतीय न्यायव्यवस्था आपल्या मनासारखा निकाल लावेल या आशेने ती माणूसपण हरवलेल्या अवस्थेत पोलिसांच्या स्वाधीन होते.

## ४. 'गारपीट' मधील व्यक्तिचित्रण :

पात्र म्हणजे व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा होय. 'कथा' या वाङ्मय प्रकारामध्ये व्यक्तिचित्रण हा घटक महत्त्वाचा ठरतो. कथानकामध्ये ज्या घटना घडतात त्या घटना लेखक पात्रांच्या माध्यमातून घडवून आणतात. व्यक्तिरेखांचा विचार करता त्या सुष्ट-दुष्ट, त्याचप्रमाणे वेगवेगळ्या स्वभावाच्या असल्याचे प्रत्ययाला येते. कथानकाच्या विकसित होण्याच्या प्रक्रियेत पात्र किंवा व्यक्तिचित्रण महत्त्वाचे ठरते. विलास सिंदगीकर पात्राच्या बाह्यवर्णनाप्रमाणे अंर्तमनाचे चित्रण करताना दिसतात.

### पुरुष व्यक्तिरेखा :

### १.लालबा मोरे :

'पोटाड्या' या कथेतील लालबा मोरे ही व्यक्तिरेखा महत्त्वाची वाटते. भारतीय संस्कृतीमध्ये पोतराज या कलेला महत्त्व दिले गेले आहे. लालबा मोरे हा पोतराज बणून आपल्या कुटुंबाचा, स्वत:चा उदरनिर्वाह करताना दिसतो. लेखकाने पोतराज लालबा मारे याचे केलेले वर्णन, "तो पोटाड्या व्हता.पोटाड्या म्हणजी पोतराज व्हता. तो रंगाने काळा-सावळा, धिप्पाड देहाचा माणूस व्हता. त्याने डोक्याचे बायकासारखे केस वाढवले व्हते. कपाळावर भल्लामोठा कुंकू लावलेला त्याचे डोळे घारे व्हते. सरळ नाकाच्या खाली कोचार मिशा व्हत्या. उघड्याबंब पोतराजने कमरेला अनेक ठिगळाचा फडका लेवला व्हता. त्या फडक्याच्या वरून बैलाच्या गळ्यातील घुंगरमाळ बांधली व्हती. त्याने पायात बारीक घुंगराचा चाळ, हाताच्या दंडात पेटी बांधलेली व्हती."[२९] अशा या लालबा मोरेला आपला खेळ परदेशात दाखविण्याची संधी मिळते. त्यामुळे तो आनंदी होतो. पण इंग्लडला जाण्यासाठी त्याला जातपंचायतीची परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी तो आपल्या जातीतील सर्वांना मांसाहाराचे जेवण घालूण परवानगी मिळवितो आणि तो आपल्या पत्नी व मुलाबरोबर लंडनमध्ये येतो. तेथे त्याचा सत्कार केला जातो. पण जेव्हा तो आपला पोतराजचा खेळ दाखविण्यास सुरुवात करतो तेव्हा मात्र पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये भारतीय कलेचे ज्ञान नसलेल्या मि.हंटरसाहेबामुळे पोतराज असणाऱ्या लालबा मोरेला मृत्यूला सामोरे जावे लागते.

२ . म्हारूती :

'लांडकसण' या कथेतील म्हारूती हा बौद्ध असणाऱ्या यशवंत भोसले याचा मुलगा असतो. म्हारूतीच्या वडिलांना शिक्षणाचे महत्त्व समजल्यामुळे आपला मुलगा म्हारूती याने खुप शिकावे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे खूप शिकून आपल्या घराचे, जातीचे, गावाचे नाव मोठे करावे अशी त्याची अपेक्षा असते. पण म्हारूतीच्या बालमनाला हे पटत नसल्यामुळे तो लांडकसण साजरा करण्यासाठी शाळा चुकवून जातो. पण जेव्हा लांडकसण हा त्याच्या जिवावर बेततो तेव्हा मात्र त्याला त्या लांडकसणामधील देवाचा फोलपणा निदर्शनास येतो. तेव्हा मात्र त्याच्यासमोर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार समोर येतात आणि त्याचे मतपरिवर्तन होऊन इथून पुढे लांडकसण साजरा करावयाचा नाही असा निश्चय करतो.

३ . संपती :

'संपत्याचं लगीन' या कथेतील संपती हा गावातील कर्ता, श्रीमंत असणाऱ्या दिलीपराव संकटे अण्णा यांचा निरक्षर, बायकी वळणाचा मुलगा असतो. त्याचे वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे केले आहे, "संपती अंगापिंडानं सडपातळ देखणा पोरा होता. संपती शारातील नखरेल पोरिवावनी अंगावर फिट कपडे वापरायचा, आणि डोस्क्याचे केसं कातरून संपत्यानं डिस्कू हिप्पीबी केल्ता शारातील मोठ्या घरच्या बायकापोरी लावत्यात त्याप्रमाणे संपती तोंडावर सुनो पावडर फासून ओठावर लालीबी लावायचा अन् संपत्या कपाळावर बारीकसा चंद्राच्या कोरीप्रमाणे गंधाचा टिकला लावीत होता. तसेच संपती हातात बायकासारखी बारीकसी लेडिज घड्याळ बांधायचा अन संपती कधीमधी तर चक्क बाळतीण बायकावानी डोळ्यात भलं लई काजळ घालायचा."[३०] अशा या संपतीचे काही केल्या विवाह होत नसल्यामुळे त्याचे आई-वडील काळजीत असतात. संपतीलाही आपला विवाह होऊ नये असे मनोमन वाटते. पण जेव्हा त्याचा विवाह निश्चित होतो, त्या दिवशी मात्र त्याच्यावर निसर्गाची कृपादृष्टी होते आणि तो विवाह मंडपातून पलायण करतो. ही व्यक्तिरेखा परिपूर्ण विनोदी वाटते.

## ४. थोरबा मोरे :

'घरकुल' या कथेतील दलित समाजातील थोरबा मोरे हा कामानिमित्त बाहेर गावी असल्यामुळे पावसाळ्यामध्ये तो गावी येतो आणि गावातील समाज मंदिरामध्ये स्वत:चा संसार थाटतो. गरीब, दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या थोरबा मोरेचा मात्र गावातील भ्रष्ट, स्वार्थी राजकारणी सरपंच टिकोजीराव पाटील स्वत:चा फायदा करून घेण्यासाठी त्याचा पुरेपूर वापर करून घेतो. गरीब, निरक्षर, अडाणी असणारा थोरबा मोरे दारिद्र्यरेषेखाली येण्यासाठी खूप श्रीमंत असावे लागते. अशा विचारसरणीने वाटचाल करताना दिसतो. थोरबा मोरे मात्र स्वत:ला शासकीय घरकुल योजनेमधून आपणाला घर मिळणार या कल्पनेने तो स्वत:ला हरवून बसतो. पण जेव्हा टिकोजीराव थोरबाची दारिद्र्यरेषेखाली नसल्याची नोंद करतो. त्याची आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याची नोंद होते आणि ऐवढे करून देखील त्याच्या हाती काही लागत नाही. तेव्हा मात्र थोरबा मोरे हताश होतो.

## ५. तुकाराम पवार :

'गारपीट' या शीर्षक कथेतील तुकाराम पवार ही व्यक्तिरेखा महत्त्वाची वाटते. तुकाराम पवार हा गावातील आदर्श शेतकरी असतो. कारण त्याला गेल्यावर्षीचा जिल्हा परिषदेचा आदर्श शेतकरी म्हणून पुरस्कार मिळालेला असतो. पण या वर्षी मात्र त्याला निसर्गाने साथ दिली नसल्यामुळे तो कर्जबाजारी होतो. या कर्जामुळेच देणेकरांचा ससेमिरा त्याच्या मागे लागतो. त्यामुळे तो मानसिक दृष्ट्या खचून जातो. गारपीटामुळे त्याच्या हाती येणाऱ्या उत्पन्नाचे मातीमोल होते. पण एक आधार म्हणून त्याला शासकीय मदत मिळणार असते. पण शासनाच्या अकार्यक्षम कारभारामुळे त्याला त्याच्या शेतीच्या नुकसानीचा पुरेपूर मोबदला दिला जात नाही. त्यामुळे तो मानसिक संतुलन बिघडल्याप्रमाणे वर्तन करतो.

## ६. सूर्याजी चव्हाण :

'टच्चा' या कथेतील शेतीसाठी उपयोगी असणारी अवजारे तयार करून देणारा सूर्याजी चव्हाण हा घिसाडी समाजातील असतो, "सूर्याजी चव्हाणने अंगात राज्यस्थानी कुर्ता -धोतर, डोक्यावर पगडीसारखा पटका बांधलेला होता. त्याचे घारे डोळे, टोकदार नाक आणि

डोक्याचे भुरे केस ठळक दिसायचे. त्याने दाढी-मिशा वाढवल्या व्हत्या, तर कानात मोठ्या आकाराची रिंग-बाळी म्हंजी डूल घातले व्हते. तसेच त्यानं हातात चांदीचे कडे, गळ्यात ताईत आणि पायात राज्यस्थानी जोडा घातला व्हता."[३१] असा हा सूर्याजी चव्हाण गावी येताच बौद्ध वस्तीमध्ये असणाऱ्या मातंग वाड्यामध्ये आपला संसार थाटतो. शिक्षणापासून अलिप्त असणारा, भटकंती करून जगणारा सूर्याजी चव्हाण हा व्यसनी असतो. पण गेल्या वर्षी त्याला पिसाळलेले कुत्रे चावल्यामुळे तो ही पिसाळला जातो. त्याच्यावर भयंकर प्रसंग ओढवला जातो. पिसाळल्यामुळे लोकांनीही सूर्याजीला दोरीने खाटवरती बांधून ठेवले जाते आणि त्याच्यात भर म्हणून निसर्गही आपले रूप दाखवितो.जोरदार पावसामुळे सूर्याजी चव्हाणासारख्या तरुणाला मृत्यूला आपलेसे करावे लागते.

**७. राजेसाब :**

'सोंग' या कथेमधील मुस्लिम समाजातील राजेसाब हा वीस-बावीस वर्षाचा तरुण असतो. तो विवाहित असतो. पण काही कारणास्तव त्याची पत्नी त्याला सोडून गेल्यामुळे त्याचा संसार मोडकळीस येतो. पण तरीही मोहरम या सणासाठी तो स्वत:हून उत्साहाने सोंग आणण्यामध्ये सहभागी होतो. कारण त्याच्या सोंगाशिवाय मोहरम सणाला रंगत येत नसते. त्यासाठी त्याने चार वर्षापासून सोंग सादर करण्यासाठी सुताराकरवी भुताच्या आकाराचा मुखवटा तयार करून घेतलेला असतो. राजेसाब ही विनोदी व्यक्ती असल्यामुळे तो लोकांना खूप हसवितो. पण हाच मुखवटा त्याला मृत्यूला आपलेसे करावयास भाग पाडतो.

**८. काडेप्पा आडे-पाटील :**

'भाकरीचं झाड' या कथेतील बेरकी व्यक्ती असणारा काडेप्पा आडे-पाटील हा मोहाडी तांड्याचा माली पाटील असतो. मोठा दीर असणारा काडेप्पा आडे-पाटील गजराबाई हिच्याशी शारिरीक संबंध ठेवण्याच्या हेतूने येतो. पण गजराबाई त्याला जेव्हा विरोध करते, तेव्हा मात्र तो तिच्यावर सूड घेण्याच्या हेतूने तिच्यावर मोहाची दारू करून विक्री करते अशी केस करतो, आणि जेव्हा पोलीस तिला पकडून नेतात. तेव्हा आपला हेतू साध्य होणार या हेतूने तो आनंदी होतो.

९. वामन सडके :

'उद्ध्वस्त' या कथेतील शिक्षकी पेशामध्ये कार्यरत असणारा वामन सडके ही व्यक्ती समाजाला घातक ठरणारी व्यक्ती आहे. शिक्षक हा समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा पुरस्कार करणारा व जातीभेदाची संकल्पना मोडून काढणारा घटक, पण शिक्षकी पेशाला लाजवेल असा हा वामन सडके दलित समाजातील स्त्रीवर अत्याचार करतो. तिला अमानवी अशी वाईट वागणूक देतो. तिला वाचविण्यासाठी आलेला तिचा भाऊ बाजीराव यालाही वामन सडके आपल्या माणसांच्या सहाय्याने त्याच्यावर हल्ला करून कांठाच्या सहाय्याने त्याला खूप मारतो आणि शेवटी माणूसकी नसणारा, समाजाला घातक ठरणारा वामन सडके रॉकेलच्या सहाय्याने बाजीरावला पेटवतो पण त्याच्या या वाईट कृत्याची शिक्षा म्हणून त्याला पोलिस पकडून नेतात.

१०. आनंद गोरे :

'वळणवाटा' या कथेतील आनंद गोरे हा चौदा-पंधरा वर्षापासून परिवर्तनवादी चळवळीमध्ये कार्यरत असतो. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांनी प्रेरित झालेला असल्यामुळे तो विवाह इच्छुक मुलगी पाहवयास जाण्यास विरोध दर्शवितो. कारण त्याने स्त्री-पुरुष समानता हे तत्त्व अंगिकारलेले असते. दलित समाजातील आनंद मात्र पाहूण्याच्या आग्रहास्तव तो मुलगी पाहवयास जातो. पण त्या मुलीमध्ये व त्याच्यामध्ये असणाऱ्या वैचारिक मतभेदामुळे तो आपला स्वतंत्र मार्ग निवडतो.

**गौण पुरुष व्यक्तिरेखा :**

१. 'घरकुल' या कथेतील गावचे सरपंच टिकोजीराव पाटील ही बेरकी व्यक्ती आहे. गावातील प्रत्येक योजनेमध्ये भ्रष्टाचार करणारा, पैसे खाणारा टिकोजीराव पाटील आगामी निवडणूकीवर नजर ठेऊन स्वत:ला निवडणूकीचे तिकीट मिळविण्यासाठी तो घरकुल योजनेचा पुरेपुर फायदा उठवतो. त्याच्यामध्ये दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या

थोरबा मोरेचा आपल्या स्वार्थासाठी फायदा करून घेतो. गरीब, दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या थोरबा मोरे आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याची नोंद सरकार दरबारी करतो.

२. 'टच्चा' या कथेतील गौतम सूर्यवंशी ही व्यक्ती सहाय्यक म्हणून आलेली दिसते. शिक्षकी क्षेत्रात कार्यरत असणारा गौतम सूर्यवंशी प्रज्ञा, शील, करूणा याचे पालन करणारा आंबेडकरांच्या विचाराने वाटचाल करताना दिसतो.

३. 'प्रतिशोध' या कथेतील लेखक स्वत: एक पात्र म्हणून वावर करताना दिसतो. आंबेडकरी विचारांनी प्रेरित होऊन वाटचाल करणाऱ्या लेखकाने मनुवादी भटा-ब्राह्मणांना विरोध केला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी सत्यानारायणाच्या पुजेचा फोलपणा उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्त्री व्यक्तिरेखा :**

विलास सिंदगीकरांनी ज्याप्रमाणे पुरुष व्यक्तिरेखांचा कथानकाच्या दृष्टीने प्रभावशाली वापर केलेला आहे. त्याचप्रमाणे त्या स्त्री व्यक्तिरेखांच्याही बाह्यमनाचा व अंर्तमनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**१. गजराबाई :**

'गजराबाई' ही मोहाडी वस्तीमध्ये राहणारी निराधार असणारी अशी स्त्री. लाकडाच्या बंदाट्याचे कौलारू घर करून ती राहत असे. अशा या गजराबाईचे लेखकाने केलेले वर्णन, "गजराबाई पाच फूट उंच, हडकुळा देह, पण रेखीव बांध्याची होती. केसांचा बुचडा बांधलेला. त्या बुचड्याला रिबीनीनं आवळलेलं तिने अंगात जुनाच ठेवणीचा घागरा घातला होता. तिच्या अंगावरील पोलक्याला आरसे, बंदे, छोटे घुंगरं आणि उलनचे गोंडे बांधले होते. तिन नाकात बेसर घातली होती. चेहरा मोहक गोंदवलेला. गजराबाईच्या पायात मोठे वेलीसारखे वाकडे रूप्याचे वाळे होते. तिचं सौंदर्य भकास सृष्टीत पळस फुलल्यासारखं होतं अन् हसण म्हणजे मंदिरातील घंटीसारखं पवित्र होतं."[३२] अशी ही गजराबाई प्रामाणिक आणि स्वत:चा स्वाभिमान सांभाळणारी अशी स्त्री. जेव्हा तिचा दीर तिच्याशी शारीरिक संबंध ठेवण्यासाठी येतो, तेव्हा ती त्याला विरोध करते आणि त्यामध्ये



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

तिच्या दिराचा डोळा फुटतो. पण जेव्हा तिच्यावर सूड उगविण्याच्या हेतूने ती मोहाच्या फुलाची दारू काढून विकते असा खोटा आरोप केला जातो. तेव्हा तिला पोलीस पकडून नेतात. न्यायाधिश तिला जेव्हा शिक्षा सुनावतात तेव्हा ती शिक्षा वाढवून द्यावी अशी विनंती करते आणि म्हणते, "व्हय सायब, मला माझ्या धनेरपास्नं दिसं जावून तीन-चार महिने झालेत. आणखी सहा महिन्याची शिक्षा झाली तर पोटाला पोटभर खायला भाकर मिळेल? माझ्या लेकराचीबी सोय व्हईल आन् माझ लेकरू कुपोषणाचा बळी ठरून मरणार नाय."[३९] इतक्या दूरवरचा विचार करणारी गजराबाई विलक्षण अस्वस्थ करणारी व्यक्तिरेखा आहे.

२. वंदना :

'वळणवाटा' या कथेमधील पाश्चात्त्य संस्कृतीला बळी पडत चाललेल्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी स्त्री म्हणजे वंदना होय. विवाह इच्छुक वंदनाला जेव्हा पाहावयास येतात तेव्हा मात्र वंदना आपल्या आवडी-निवडी, वैचारिक मतभेद ती आनंदला बोलून दाखवते. कारण तिचे मत असे असते की, भाषणबाजी आणि सामाजिक चळवळी करणाऱ्यांचा संसार कधीच सुखी होऊ शकत नाही. जीवनातील प्रत्येक भौतिक सुखाचा हा उपभोग घेतला पाहिजे. असे आपले मत ती आनंदला पत्राच्या माध्यमातून कळविते. तेव्हा तिच्या विचारांमध्ये असणारी संकुचित वृत्ती दिसून येते.

३. लता :

'उदध्वस्त' या कथेतील लता ही राजाराम कदम याची मुलगी. कथेच्या दृष्टीने ही व्यक्तिरेखा विलक्षण अस्वस्थ करते. दुष्काळाच्या काळात आपल्या भावाच्या विवाहासाठी ती आपल्या गावी येते, "लता म्हणजे वेली. लता खरंच कोमल मनाची, हळवी... मुंबईत जन्मून तिथंच वाढलेली...निरागस मुलगी होती. तिला जात-धर्म याची भयानक जाणीव नव्हती. तिला शिवाशिव-विटाळ माहित नव्हता. खेडेगावात जात गेचूडासारखी माणसाच्या मनात २१ व्या शतकातही चिकटून असलेली तिला काय माहित ?"[३४] अशा या लताला केवळ अस्पृश्य असल्यामुळे मनूवादाकडून, सवर्णाकडून खूप मोठी किंमत मोजावी लागते. केवळ हापसावरील पाणी भरण्यासाठी पुढाकार करणाऱ्या लताला अस्पृश्यतेची खुप मोठी किंमत मोजावी लागते.

**गौण स्त्री व्यक्तिरेखा :**

- राजेसाबची आई सकिनाबाई ही मुस्लिम समाजातील साधी सरळ स्वभावाची अशी स्त्री आहे. त्यामुळे ती आपली नांदावयास नसलेली सून परत यावी म्हणून मोहरम सणामध्ये डोल्याला लंगर घालते. कारण तिला आपल्या मुलाचा संसार व्यवस्थित चालावा असे वाटते.
- पोतराज लालबा मोरे याची पत्नी हरणाबाई आपल्या पतीबरोबर पोतराजची कला सादर करण्यास मदत करून कुटुंबाला हातभार लावते. पण जेव्हा परदेशात पोतराज या कलेमुळे पतीला मृत्यूला सामोरे जावे लागते. तेव्हा मात्र ती आपल्या देशात येऊन पोतराज म्हणून सोडलेल्या आपल्या मुलाचे केस कापते. खंडोबाच्या मंदिरासमोर आपले ढोलकं फोडते आणि मोडलेले ढोलकं, कवड्याची माळ, देवाचा फोटो या पोतराज खेळाचे साहित्य देवळासमोर ठेऊन त्याला आग लावते. अशा प्रकारे हरणाबाईला देवामधील फोलपणा लक्षात येतो. तेव्हा तिला खुप वाईट वाटते.

- **'गारपीट' मधील संवादात्मकता :**

संवाद या घटकाला नाटकाचे सर्वात महत्त्वाचे अंग मानले जाते. त्याचप्रमाणे कथा, कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये तो महत्त्वाचा भाग बनलेला दिसून येतो. कथेमध्ये ज्या प्रमाणे कथानक, स्वभावचित्रण, वातावरण, भाषाशैली हे घटक जसे महत्त्वाचे असतात त्याचप्रमाणे पात्रांच्या तोंडून येणारे संवाद हा ही महत्त्वाचा घटक असल्याचे दिसून येते. म्हणूनच संवादाविषयी आपले मत व्यक्त करताना सुधा जोशी म्हणतात, "पात्राचे प्रत्यक्ष बोलणे आणि त्याच्या मनातील वास्तविक अभिप्राय यातील अंतर्विरोधाचा ताण संवादातून ध्वनित होतो."[३५] म्हणजेच पात्रांच्या संवादांतून घटना-प्रसंग आणि व्यक्ती एकाच वेळी अभिव्यक्त होताना दिसते. लेखक संवादाची विशिष्ट प्रकारची योजना करून त्या कलाकृतीला एक प्रकारचा जिवंतपणा प्रत्ययाला आणून देतो. संवादात्मकतेच्या दृष्टीने विचार करता लेखक जो समाज निवडतो त्या समाजामध्ये वावरणाऱ्या व्यक्तींचे संवाद जसेच्यातसे तो त्याच्या बोलीभाषेतून मांडतो त्यामुळे संवादाला एक वेगळेच प्रमाण प्राप्त झाल्याचे दिसून येते.

व्यक्तीचे अंतरंग समजून देण्यासाठी, मनोगताचे निवेदन करण्यासाठी लेखक संवादाचा वापर यशस्वीपणे करताना दिसून येतो. त्या संवादामुळे कथानकाला एक विशिष्ट प्रकारची गती प्राप्त झाल्याचे दिसून येते. कथात्मकतेचे कार्य संवाद या घटकामुळे यशस्वीरित्या पार पडते.

विलास सिंदगीकर यांच्या 'गारपीट' या कथासंग्रहातील सर्वच कथा त्यातील संवादात्मकतेमुळे वाचनीय बनलेल्या दिसून येतात.

उदा.१ 'टच्चा' या कथेतील सूर्याजी चव्हाण व त्याचा सासरा यांच्यातील संवाद पाहण्यासारखा आहे. सूर्याजी चव्हाण सासऱ्याला म्हणतो,

"सुरवसे, च्याय पिओ ?"

"आरं बॉ ऽ कोण च्याय नकू पितिलो."

"आरं हाव... गज्या, गाढवं हाकलुस्नं ? आरं हिकड आवसनं सावकाराच्या दुकास्नी, जाऊन जल्दीनं साखर-पती लावस. सोयरे च्याय पितिलो."

"आरं हायो सूर्या, तुली कितलू रायतं हुयं ?"

"आज कितलो की धंदो हुया नस. लोक उधारीचं नेता हावस" तो सासऱ्या म्होरं उतरला."[३६]

उदा. 'घरकुल' या कथेतील थोरबा मोरे आणि टिकोजीराव पाटील मधील संवाद

"आरं थोरबा, तुझ्या गळ्याला किती जितरप हाय ?" टिकोजीराव पाटील उतरले.

"एक पोरगं आन् दोन पोरी हायतं बघा."

"तू लई पसारा वाढवला नाहीस तेबी बरं झालं मग गावात कशापायी आला व्हतास ? तुला काय आडचन बिडचन तर नायना ?"

"म्या जाग्यावर कुडी उभारावं म्हणतूय"

"मग...!"

"म्या चार-पाच वासे, कुरमड मिळत्याल म्हणून आलाव जी"

"यंदा गावात राहयचा इचार हाय का ?"

"म्या आपली पंढरी सोडून कुठं जाणार, मालक ? या पंढरीत आपला शेवट...!"

"आरं थोरबा, गावात घरकुलची इस्कीम आली हाय. मग तुझी तयारी आसल तर...? मग आमाला नंतर सांग"

"म्या कमी रूपये लागल्यास भरीन जी मला वजं उचलायपुरतं सांगा म्हणजी झालं"

"पण तू दारिद्र्यरेषेखाली आहेस का नाय?"

"म्या कुठं गावावर हाय. म्या दलिंदर रेषात हाव का नाय ते मला काय ठाव?"

"मग तू दुपारच्याला ग्रामपंचायतीत ये...म्या तुझ्या नावाची यादी बघून ठेवतो. तुझं नाव नसलं तरीबी माझ्या नावावर तुला झोपडपट्टीची खोली देऊन टाकू, मग तर झालं नव्हं?"[३७]

- **निसर्गचित्रण :**

एखाद्या कलाकृतीच्या वातावरण निर्मितीचा विचार करीत असताना त्या कलाकृतीमधील निसर्गाचे वर्णन येणे स्वाभाविकच असते. सिंदगीकरांच्या 'गारपीट' या कथासंग्रहामधून जो निसर्ग येतो तो आशय विषयाला अनुसरूनच. निसर्गाला ग्रामीण जीवनामध्ये फार मोठे महत्त्व देऊ केले आहे. निसर्ग हा ग्रामीण जीवनाचा एक अविभाज्य असा भाग आहे. किंबहुना सिंदगीकरांच्या कथांमध्ये निसर्ग हा एक स्वतंत्र पात्र म्हणून वाचकांसमोर उभा राहतो. कथेची परिणामकता निसर्ग चित्रणातून झाल्याची जाणवते. 'टच्चा' या कथेत घिसाडी समाजातील सूर्याजी चव्हाण गावात सायंकाळच्या वेळेत दाखल होतो. तेव्हा लेखकाने केलेले वर्णन, "दिस मावळतीस झुकल्ता... चांगल कळलेलं अंधार सूर्याला गिळत व्हता अन् रानोमाळ शेताच्या कामाला गेलेली बाया-बापडे, गुरं-ढोर वस्तीला वापस याल्ती त्या वकताला रिमझिम पावसालाबी जारी झालं व्हतं. तसं सूर्याजी चव्हाण घिसाडी गावाला येऊन हाजर झाला."[३८] तर काही कथेमध्ये निसर्ग हा पात्रांना निराशेचा भाग म्हणून येतो. 'गारपीट' या शीर्षक कथेमधून पावसाची वाट पाहणाऱ्या तुकाराम पवाराचे वर्णन केले आहे. "यंदा हवामान खात्यानं चांगला पाऊस व्हणार असल्याचं भाकित केलं म्हणून तुकाराम पवारानं हंडरगुळी-हाळीच्या बाजाराला जाऊन खेंडी-मेंडी बैलाची जोडी विकत आणली काळ्या मायचा पांग फेडण्यासाठी कुऱ्या सज्ज केला. पण पावसाने कोल्ह्यासारखी हुलकावणी दिली.

बळीराजाच्या मनासारखा पाऊस झाला नाही. तरीही गावातील शेतकऱ्याबरोबर तुकाराम पवारानं धूळपेरणी केली. अन् चातक पाखरासारखी पावसाची वाट बघत बसला. तसं मिरगाचा पाऊस दूरदेसाला निघून गेला, पेरलेलं बी मातीत काजळलं, कोमजलं, धगीनं त्याची राख झाली. तुकाराम पवाराच्या म्होर 'दुकूळ' तोंड वासून उभा राहिला."[३९] अशाप्रकारे निसर्गचित्रणामधून पात्रे जिथे जगतात, वावरतात तो प्रदेश या सर्वांमधून एकसंघ असे वास्तव लेखक घडवितो.

**निष्कर्ष :**

१. 'गारपीट' या कथासंग्रहाचा समग्रपणे विचार करता त्यातील प्रत्येक कथा ही वास्तवतेच्या जवळ जाणारी असून सामाजिक प्रश्न मांडण्याला प्राधान्य देते.

२. त्यांच्या कथेत ग्रामीण, दलित, आदिवासी इत्यादी जीवनाचा वेध घेतला असून स्वातंत्र्योत्तर काळात उदयास आलेल्या ग्रामीण, दलित आदिवाशी प्रवाहाचे एकत्र रूप म्हणजे सिंदगीकरांची कथा होय.

३. त्यांनी कथांच्या माध्यमातून पुरुष व्यक्तिरेखेबरोबर स्त्री व्यक्तिरेखेच्या बाह्यवर्णनाप्रमाणे त्याचा अंर्तमनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

४. ग्रामीण जीवनातील बोलीभाषेमुळे कथांमधील संवादाला जिवंतपणाचा प्रत्यय येतो.

५. वातावरण निर्मिती घडवून आणण्यासाठी सिंदगीकरांनी कथांच्या माध्यमातून प्रभावशाली निसर्ग चित्रण केलेले आहे.

## संदर्भ :


| | | | |
|---|---|---|---|
| १. | सिंदगीकर, विलास | - | 'गारपीट', संगत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती नोव्हेंबर - २००५, पृ.४९ |
| २. | तत्रैव | - | पृ.४९ |
| ३. | तत्रैव | - | पृ.७८ |
| ४. | तत्रैव | - | पृ.८४ |
| ५. | तत्रैव | - | पृ.१३२ |
| ६. | तत्रैव | - | पृ.१३२ |
| ७. | तत्रैव | - | पृ.३८ |
| ८. | पानतावणे, डॉ. गंगाधर | - | 'साहित्य प्रकृती आणि प्रवृत्ती', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली - ऑगस्ट, १९९९. पृ.१२६ |
| ९. | सिंदगीकर, विलास | - | उ.नि. पृ.१०२ |
| १०. | तत्रैव | - | पृ.१०७ |
| ११. | तत्रैव | - | पृ.९० |
| १२. | तत्रैव | - | पृ.९६ |
| १३. | तत्रैव | - | पृ.९६ |
| १४. | तत्रैव | - | पृ.९६ |
| १५. | तत्रैव | - | पृ.१२४ |
| १६. | तत्रैव | - | पृ.१२५ |
| १७. | तत्रैव | - | पृ.२५ |
| १८. | तत्रैव | - | पृ.२८ |
| १९. | तत्रैव | - | पृ.२९ |
| २०. | तत्रैव | - | पृ.३० |
| २१. | तत्रैव | - | पृ.५६ |
| २२. | तत्रैव | - | पृ.५७ |
| २३. | तत्रैव | - | पृ.६१ |
| २४. | तत्रैव | - | पृ.६१ |
| २५. | तत्रैव | - | पृ.११४ |
| २६. | तत्रैव | - | पृ.११४ |


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

२७. मनुघाटे, डॉ.प्रमोद - 'आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ३० जानेवारी २००७, पृ.२१
२८. सिंदगीकर, विलास - उ.नि.पृ.७३
२९. तत्रैव - पृ.७७
३०. तत्रैव - पृ.११२
३१. तत्रैव - पृ.४५
३२. तत्रैव - पृ.७०
३३. तत्रैव - पृ.७३
३४. तत्रैव - पृ.१३१
३५. जोशी, सुधा - 'कथा : संकल्पना आणि समीक्षा', मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती-१ फेब्रुवारी २०००, पृ.२४
३६. सिंदगीकर, विलास - उ.नि.पृ.४७
३७ तत्रैव - पृ.१२४
३८. तत्रैव - पृ.४५
३९. तत्रैव - पृ.२१